# संत कथा



डॉ. न. म. जोशी

# संतकथा

डॉ. न.म. जोशी

सुयोग प्रकाशन
पुणे

❖ संतकथा
SantKatha

❖ प्रकाशिका
सौ. सुचेता राळे
९८६, सदाशिव पेठ
ज्ञानप्रबोधिनी रस्ता,
पुणे ४११ ०३०.
फोन :(फॅक्स) २४४९ ५५ ८४.

❖ डॉ. न.म.जोशी
१०१३, सदाशिव पेठ,
लो.टिळक रस्ता, 'गंधाली', पुणे-४११०३०
दूरध्वनी : (०२०) २४४७६८६८/९२२६५७५२९०

❖ प्रकाशन क्रमांक : ३३८

❖ प्रकाशन दिनांक : ऑक्टोबर २०१६

❖ अक्षरजुळणी : भाग्यश्री अक्कलकोटे

❖ मुखपृष्ठ : राजेंद्र गिरधारी

❖ मुद्रक : एक्सेल प्रिंटर्स, पुणे

❖ मूल्य : रुपये ५०/- फक्त

## ❊ डॉ. न. म. जोशी यांची साहित्य संपदा ❊

१) मुलांसाठी शिक्षणकथा

२) नमगोष्टी

३) फत्तेवाडीचा झुंजार

४) लालबहाद्दूर शास्त्री

५) बजरबट्टू

६) संतकथा

❖ ❖ ❖

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | नको ते देऊन टाकले | ५ |
| २. | थैलीची किंमत | ७ |
| ३. | मी उपदेश दिला आहे | ९ |
| ४. | कटोरा फेकून दिला | ११ |
| ५. | रेड्यामुखी वेद | १३ |
| ६. | पूर्णाकडून पूर्णाकडे | १५ |
| ७. | भक्तीचा पाऊस | १७ |
| ८. | गुरुभक्ती | १९ |
| ९. | मजबूत किल्ला | २१ |
| १०. | नश्वर ते सुंदर | २३ |
| ११. | स्वार्थी प्रेम | २५ |
| १२. | निर्वैर भूमी | २७ |
| १३. | महीज ब्रह्माची उपासना | २९ |
| १४. | सदा ध्यान भगवंताचे | ३१ |
| १५. | वारीः महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित | ३३ |
| १६. | देवाची निवड | ३५ |
| १७. | मोक्ष | ३७ |
| १८. | अपवित्र हात | ३९ |
| १९. | तीन प्रश्न- एक उत्तर | ४१ |
| २०. | कुकर्माची फळे | ४३ |
| २१. | मातृवध आणि पितृवर | ४५ |
| २२. | कुंडल्यांचे विसर्जन | ४७ |
| २३. | नवा युगधर्मः अग्निहोत्र | ४९ |
| २४. | दगड आणि सोनं | ५१ |

# १. नको ते देऊन टाकले

महात्मा गौतमबुद्ध थोर संत होते. अहिंसेची उपासना आणि शांततेची आराधना ही त्यांची वैशिष्ट्ये होती. गौतम बुद्ध अनेक ठिकाणी लोकांच्या प्रबोधनासाठी जात असत. अशाच एका गावी ते गेले होते. त्या गावातील लोकांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. त्यांना वस्त्रे दिली, फळे दिली, काहींनी तर सुवर्णालंकारही दिले.

गौतमबुद्ध निर्लेप निरपेक्ष संत होते. त्यांना यातलं काहीच नको होतं. पण लोकांच्या प्रेमाचा स्वीकार करण्यासाठी त्यांनी काही फळं खाल्ली आणि वस्त्रे,अलंकार, उरलेली फळं त्या गावातल्याच लोकांना त्यांनी वाटून टाकली. दोन दिवसांनंतर गौतमबुद्ध पुढील गावी जाण्यास निघाले. त्यांचा मुक्काम वनातच होता. गावकरी निरोप द्यायला आले. सर्वांचे डोळे पाणावले होते. जड अंत:करणानं गावकऱ्यांनी बुद्धांना निरोप दिला.

असेच मजलदरमजल करीत लोकांना भेटत, लोकांच्या प्रेमाचा स्वीकार करीत, सामान्यजनांचं प्रबोधन करीत, गौतमबुद्ध आगेकूच करीत होते.

आता ज्या प्रदेशात ते जाणार होते त्या प्रदेशातील लोक गौतमबुद्धांच्या विरोधात होते. गौतमबुद्ध यांचं तत्त्वज्ञान त्यांना पटणारं नव्हतं. नव्हे ते त्यांना पटवून घ्यायचंही नव्हतं.

तरीही गौतमबुद्ध यांनी ठरवलं की आपण लोकांना भेटायचं, त्यांच्याशी संवाद करायचा.

गौतमबुद्ध एका झाडाखाली शांतपणे बसले होते. गावकऱ्यांची झुंड आली. गावकरी तावातावानं बोलत होते. कुणी हातवारे करीत होते. कुणी अचकट-विचकट बोलत होते. त्यातील काही लोकांनी तर गौतमबुद्धांना खूप दूषणे दिली. बौद्ध धर्माचा प्रसार म्हणजे समाजात विष कालविणे आहे असे ते लोक म्हणाले.

गौतमबुद्ध शांत होते.

समोरची झुंड दूषणे देऊन दमली. त्यांचे आवाज बंद झाले. मग त्यांच्या म्होरक्यानं गौतमबुद्धांना मानभावीपणानं विचारलं...

'काय हो भगवान गौतमबुद्ध! आम्ही इतका वेळ बोलत आहोत. दूषणे देत आहोत, आमच्यापैकी काही लोकांनी तर तुम्हाला शिव्या दिल्या. तुमची भरपूर निंदानालस्ती केली. तुम्ही तर काहीच बोलत नाही.'

गौतमबुद्ध हसले आणि शांतपणे म्हणाले -

'लोकांनी दिलं तरी आपण घेतलं पाहिजे ना.'

'म्हणजे?'

'हे बघा मित्रांनो, तुमच्या गावाआधी पलिकडच्या त्या गावी मी गेलो होतो. तिथं लोकांनी माझा मोठा सत्कार केला. वस्त्रं दिली, फळं दिली. त्यातलं मला हवं तेवढं ठेवलं. आणि बाकीचं लोकांनाच परत करून टाकलं.'

'पण त्याच इथं काय?'

'यागावी तुम्ही मला भरपूर दूषणे दिलीत. तुम्ही दिली पण मी ती घेतलेली नाहीत. मला ती नकोत.

तुमची दूषणे मी तुम्हालाच परत दिली आहेत. मला नको ते मी तुम्हालाच देऊन टाकले आहे.'

लोकांचे चेहेरे बघण्यासारखे झाले.

■ ■ ■

# २. थैलीची किंमत

ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज हे नामसाधक होते. नित्यउपासना ही नामसाधनाने सर्वांना करता येईल यावर त्यांच्या दृढ विश्वास होता. महाराजांशी संवाद करताना अनेक भक्तमंडळी त्यांना प्रश्न विचारीत आणि महाराज त्यांना पटणारी उत्तरे देत. भक्तांचे समाधान होत असे.

कधीकधी महाराज उत्तर देतही नसत. पण एखाद्या वस्तूकडे, जागेकडे बोट दाखवून विचारीत-

'हे काय आहे?'

'ही गाय आहे. हे कापड आहे..' वगैर उत्तरे भक्त देत. मग महाराज त्या उत्तरातील शब्दांवरूनच मूळ प्रश्नाचे उत्तर सांगत व पर्यायाने भक्ताला स्वत:ला त्याबाबत विचार करायला लावीत.

दानाचे महत्त्व काय, म्हातारपणी कसे वागावे,

संस्कारकर्माचा हेतू काय येथपासून श्रीमंत कसे व्हावे येथपर्यंत लोक प्रश्न विचारीत.

एकदा गोंदावले येथे असेच महाराज सत्संगात दंग असताना परगावचे काही दर्शनेच्छू आले होते. त्यातील एकजण जरा अधिकच जिज्ञासू होता. तो सुशिक्षित होता. त्यानं विज्ञानाचा अभ्यास केला होता. त्यामुळं त्याच्या प्रश्न विचारण्यातही अधिक तर्ककठोरपणा जाणवत होता.

'महाराज,देहाची किंमत काही नाही. आत्माच मूल्यवान असं तुम्ही सांगता. पण आत्मा ज्या देहात असतो त्याची काही किंमत नाही असं कसं होईल? देहरूपालाच अधिक किंमत आहे. आपण समजावून सांगा.'

मग महाराजांनी त्याला सांगितलं...

'आताच उत्तर द्यायला हवं असं नाही. तुम्ही अजून इथं आहात. तुम्हाला मी नक्कीच उत्तर देईन, थोडं थांबा. '

दुसऱ्या दिवशी मठात आणि मठाच्या आवारात माणसं आपापल्या उद्योगात गर्क असताना त्या माणसाची एक थैली एका जागी विसरली. कुण्या साधकानं ती महाराजांजवळ आणून दिली.

महाराजांनी आपल्या शिष्याला सांगितलं, या थैलीतल्या सर्व वस्तू काहीकाळ बाजूला ठेव. थैलीच फक्त इथं रहून दे.

मग ते गृहस्थ आले. त्यांनी विचारलं, 'महाराज,माझी थैली इथं राहिली?'

'हो,ती आहे तिथं. घ्या.'

त्या गृहस्थांनी थैली बघितली. थैली रिकामीच. आत वस्तू नव्हत्या. त्या थैलीत त्यांचं पैशाचं पाकीटही होतं. पण आता तर थैली रिकामीच.

'महाराज,थैली मिळाली पण आतील वस्तू....'

'अहो,त्याचं काय विशेष! थैली तर मिळाली ना....' 'पण महाराज पैशाचं पाकीट... खूप पैसे होते. या थैलीला नुसत्या काय किंमत?'

'छान.. मग देहाला नुसत्या काय किंमत,असं नाही तुम्हाला वाटत?'

मग ते गृहस्थ काय समजायचं ते समजले. त्यांना त्यांच्या प्रश्नाचं उत्तर कळलं, थैलीची किंमत आणि थैलीतील ऐवजाची किंमत त्यांना समजली.

मग ते नामसाधनेच्या मार्गाला लागले.

■ ■ ■

# ३. मी उपदेश दिला आहे

साधु वासवानी त्या भिकाऱ्याजवळ गेले. आपल्या खिशातली चार-दोन नाणी वासवानी यांनी त्याच्या कटोऱ्यात टाकली. वासवानी यांच्या खांद्यावर कुणीतरी एक शाल पांघरली होती. ती शाल त्या भिकाऱ्याला अंगभर पांघरली.

प्रसिद्ध सिंधी संत साधु टी. एल. वासवानी हे साधी राहणी असलेले व ईश्वरचिंतनात सदैव मग्न असलेले साधु होते. स्वातंत्र्यपूर्व काळातली गोष्ट आहे. त्यावेळी आताच्या पाकिस्तानात असलेलं कराची हे शहर मुंबई इलाख्यात होतं. मुंबई इलाखा खूप विस्तृत होता. साधु टी. एल. वासवानी तेव्हा मुंबईला होते. पण ते कराचीलाही राहात असत. कराचीला त्यांचे अनेक ठिकाणी सत्संग होते. भजने होत. त्यांची अमृतवाणी ऐकण्यासाठी अनेक लोक आतुर असत. कराचीतील जनतेला त्यांचे शब्द फुलांसारखे वाटत.

एकदा असाच सत्संगाचा कार्यक्रम होता.

थंडीचे दिवस होते. एका मोठ्या थोरल्या सार्वजनिक हॉलमध्ये साधु वासवानी यांचं प्रवचन आयोजित केलं होतं. कराची शहरातील बरेच उच्चभ्रू लोक या प्रवचनाला आले होते. थंडीचे दिवस होते म्हणून लोक उबदार कपडे घालून आले होते. स्त्रियांनी शाली पांघरल्या होत्या. मुलांनी कानटोप्या घातल्या होत्या. पुरुषमाणसं स्वेटर, कोट, मफलर अशा बंदोबस्तात आली होती. हॉल गच्च भरला होता.

साधु वासवानी यांचा वेश तर अगदी साधा होता. गुडघ्याखाली जाणारी अर्धी विजार, अर्ध्या बाह्यांचा अंगरखा आणि डोक्याला साधी गांधी टोपीसारखी टोपी... अशाच वेशात वासवानीजी आले.

व्यासपीठावर वासवानी स्थानापन्न झाले. हॉलच्या दरवाजातही लोक

दाटीवाटीनं उभे होते. मग त्या समारंभाच्या सेक्रेटरीनं प्रास्ताविक केलं. सुरुवातीचं ईश्वरास्तवनात्मक भजन सुरू झालं.

भजन सुरू असतानाच त्या हॉलच्या एका दरवाजात एक गरीब भिकारी, थंडीनं कुडकुडत येऊन उभा राहिला. त्याच्या अंगावर एकच फाटका सदरा होता. सतरा ठिकाणी फाटलेला, हाती फुटका कटोरा होता. त्याला कोण भीक देणार होतं? इथं आध्यात्म चाललेलं होतं.

भजन सुरू होतं.

साधु वासवानी उठले, त्या भिकाऱ्याजवळ गेले. तो केविलवाणेपणे आशाळभूत नजरेनं त्यांच्याकडं बघत होता.

आपल्या खिशातली चार-दोन नाणी वासवानी यांनी त्याच्या कटोऱ्यात टाकली. वासवानी यांच्या खांद्यावर कुणीतरी एका शाल पांघरली होती. ती शाल साधु वासवानी यांनी त्या भिकाऱ्याला अंगभर पांघरली.

सर्व लोक हे दृश्य बघतच होते. भजन ऐकत होते. तो भिकारी अत्यंत समाधानानं दुवा देत निघून गेला. प्रास्ताविकाचं भजन संपलं . मग सेक्रेटरी म्हणाले, "आता आपले कान ज्यासाठी आतुर आहेत तो कार्यक्रम. साधु वासवानी प्रवचन करतील. आपल्याला उपदेश देतील."

सेक्रेटरी खाली बसला. वासवानी तसेच बसून होते. बराच वेळ झाला. लोकांची चुळबुळ सुरू झाली. सेक्रेटरी म्हणाला,

" वासवानीजी उपदेश देताय ना?"

"मी उपदेश दिलाय. तुम्ही सर्वांनी बघितलाय. नुसत्या शब्दांचा उपदेश काय कामाचा? कृती हवी" लोक अंतर्मुख झाले.

■ ■ ■

# ४. कटोरा फेकून दिला

जगज्जेता अलेक्झांडर दि ग्रेट, जग जिंकायला निघाला होता तेव्हाची गोष्ट. तलवारीच्या पात्यावर जगाला तोलणारा हा योद्धा भूमी पादाक्रांत करीत गेला पण त्याची लालसा वाढतच राहिली.

डायजिनस नावाचा नि:संग साधू होता. अंगावरचे माफक कपडे आणि हाती एक कटोरा एवढंच काय ते सामान डायजिनस जवळ होतं. या नि:संग, फकीर, नि:स्वार्थी, नि:स्पृह साधूची कीर्ती अलेक्झांडरच्या कानावर गेली. अलेक्झांडरला आश्चर्यच वाटलं. आपण एकेक प्रदेश काबीज करीत निघालो आहोत आणि हा फकीर नुसता कटोरा घेऊन हिंडतो....

अलेक्झांडरनं डायजिनसला निरोप पाठवला... 'हवं ते माग' आणि काय आश्चर्य...

डायजिनसनंच अलेक्झांडरला निरोप पाठवला.. 'मला तर तुझ्याकडून काहीच नको. पण तुलाच माझ्याकडून काही हवं असलं तर माग.'

'हा फकीर मला काय देणार? याच्याजवळ फक्त एक कटोरा आहे.' असा विचार करीत अलेक्झांडर डायजिनसच्या भेटीला निघाला होता.

डायजिनस एका नदीकाठी एका झाडाखाली शांतपणे बसला होता. हाती असलेला कटोरा त्यानं शेजारी ठेवला होता. डोळे मिटून शांतपणे बसलेल्या डायजिनसची ब्रह्मानंदी टाळी लागली होती. अलेक्झांडरही दूरवर थोड्या अंतरावर येऊन उभा राहिला होता.

डायजिनसनं डोळे किलकिले केले. एवढ्यात एक कुत्रा शेपूट हलवीत पळत आला. डायजिनस आणि अलेक्झांडर, दोघंही त्या कुत्र्याकडं बघत होते. कुत्रा बहुतेक तहानलेला होता. तो बाणासारखा नदीत शिरला. काठावर थोड्या पाण्यात उभं राहून जीभ बाहेर काढून पाणी प्याला. तहान भागली. मग त्यानं नदीत थोडी बुडी घेतली. अंग भिजवलं. काठावर येऊन

अंग झाडलं आणि शेपटी हलवीत कुत्रा समाधानानं निघून गेला.

डायजिनस जागेवरून उठला. नदीच्या काठावर गेला आणि त्यानं हातातला कटोरा लांब फेकून दिला. काठावर जाऊन ओंजळीनं पाणी प्याला आणि पुन्हा झाडाखाली येऊन बसला. अलेक्झांडरही हे दृश्य बघत होता. तो पुढं आला आणि अत्यंत आदरानं म्हणाला, 'महाराज, मी अलेक्झांडर. जग जिंकायला निघालोय. पण मी तुम्हाला गुरुस्थानी मानतो. किती आपण नि:संग, नि:स्वार्थी.'

'राजा,मी काहीच नि:संग नाही. तू मला गुरुस्थानी मानतोस. पण मी त्या कुत्र्याला गुरुस्थानी मानलं. बघ त्याच्याजवळ काही संचय आहे का? तो गेला, नदीत पाणी प्याला. माझ्याजवळ हा कटारो तरी होता. नको त्या कटोऱ्याचाही मोह, म्हणून मी कटोरा फेकून दिला. राजा, जग जिंकायला निघाला आहेस. पण मनाला कसं जिंकणार! त्यासाठी या कुत्र्यासारखं नि:संग, नि:स्वार्थी व्हायला हवं.' राजा अंतर्मुख झाला.

■ ■ ■

# ५. रेड्यामुखी वेद

हे बघा, रेड्याच्या  मुखातून वेद आले किंवा नाही हे क्षणभर बाजूला ठेवू. पण मी स्वत: गेली ५० वर्षे ज्ञानेश्वरीवर बोलतोय. माझ्या मुखातून ज्ञानदेव वेद बोलवत आहेत. मग रेड्याच्या मुखातून अशक्य आहे का? धुंडामहाराज म्हणाले. तो चिकित्सक श्रोता गप्प बसला.

कै धुंडामहाराज देगलूरकर हे वारकरी संप्रदायाचे तत्वविमर्शक संत होते. धुंडामहाराजांची रसाळ कीर्तने, प्रवचने लोकांना अतिशय आवडत. मार्मिक दृष्टांताद्वारा एखादा सुंदर तत्वबोध लोकांना समजावून देण्याची त्यांची बोली आकर्षक होती. पट्टीचा वक्ता एखादे गूढ प्रमेयही लोकांच्या गळी सहजपणे उतरवतो तसे धुंडामहाराज सर्वसामान्यांचे प्रबोधन करीत.

एकदा एका गावात कै. धुंडा महाराज यांचे प्रवचन होते. त्या दिवशी ज्ञानेश्वर-चरित्राच्या आधारे महाराजांनी ज्ञानेश्वरीवर निरूपण करण्याचे ठरवले होते.

सभामंडप गच्च भरलेला होता. श्रोते दाटीवाटीने बसले होते. धुंडामहाराज आपल्या रसाळ वाणीने प्रमेयाचं विवरण करीत होते. स्थितप्रज्ञ लक्षणे सांगताना धुंडामहाराजांनी खालील ओव्या विवरणासाठी घेतल्या होत्या.

गाईची तृषा हरू, व्याघ्रा विष होऊन मारू
हे नेणेचि का करू, तोय जैसे

(पाण्याचा गुणधर्म तृषार्ताची तहान भागविणे. पाणी कधीही असं म्हणत नाही की मी गाईची तहान भागवीन आणि वाघाची तहान भागविणार नाही. वाघासाठी मी विष होईन. दोघांसाठीही पाणी हे पाणीच आहे.)

का घरिचिया उजेयेड करावा, पारखेया अंधारू होआवा
हे नेणेचे गा पांडवा, दीपु जैसा ॥

आणि महाराज ज्ञानदेवांच्या चरित्राकडे वळले. प्रवचन रंगात आलं होतं.

महाराज पैठणचा प्रसंग सांगू लागले. पैठणला ब्राह्मणांकडून मान्यता मिळविण्यासाठी ज्ञानदेव आपल्या भावंडांसहित गेले होते आणि...

काय सांगू देवा, ज्ञानोबाची ख्याती

वेद महिषामुखी, बोलवीती...

हा प्रसंग धुंडामहाराज रंगवून सांगत होते. श्रोते तल्लीन झाले होते. प्रवचन संपलं. सर्व श्रोते भारावून निघून गेले. पण एक श्रोता थांबला होता.

महाराज आपल्याशी बोलायचं आहे.

बोला,

आवाज रेड्यामुखी वेद वदवण्याचा प्रसंग छान रंगवून सांगितला. पण सध्याच्या विज्ञानयुगात हे अशक्य वाटतं. ही दंतकथा असावी. रेड्यामुखी वेद कसे वदविता येतील? हा भाबडेपणा आहे. तो माणूस एका दमात म्हणाला. हे बघा, रेड्याच्या मुखातून वेद आले किंवा नाही हे क्षणभर बाजूला ठेवू, पण मी स्वत: भेली ५० वर्षे ज्ञानेश्वरीवर बोलतोय.

माझ्या मुखातून ज्ञानदेव वेद बोलवत आहेत. मग रेड्याच्या मुखातून अशक्य आहे का? धुंडामहाराज म्हणाले, तो चिकित्सक श्रोता गप्प बसला.

■ ■ ■

# ६. पूर्णाकडून पूर्णाकडे

जीव जन्मला... तो पूर्णच होता. हात आणि पाय नंतर फुटले असं नाही. डोळे नंतर आले असं नाही. तुम्ही लहान असतानाही पूर्ण होता. मोठे झालात तेव्हाही पूर्णच होता. तुमच्या विकासाची प्रक्रिया पूर्णाकडून पूर्णाकडे होती. हेच मला सांगायचं होतं.

आश्रमात रोज सायंकाळी सत्संग असायचा. विसाव्या शतकातील आश्रम. सर्व आधुनिक सुविधा होत्या. स्वामी ब्रह्मानंद महाराजही उच्चविद्याविभूषित होते. वेद, उपनिषदे, पुराणे यांचे दाखले देत ब्रह्मानंद गहन तत्त्वांचे निरूपण करीत. एकदा महाराज

'पूर्णमदः पूर्णमिदम, पूर्णात पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय, पूर्णमेवावशिष्यते।'

यावर भाष्य करीत होते. तत्त्वज्ञानातील या गहन भागाकडे श्रोत्यांना हळूच बोटाला धरून चालत न्यावे त्याप्रमाणे महाराज नेत होते.

त्यांनी पहिलं उदारहरण दिलं.

श्रोतेहो, शून्य कितीही काढा. केवढंही मोठं काढा. लहान शून्य हे शून्यच, त्यापेक्षा मोठं शून्य हे शून्यच आणि त्याहीपेक्षा मोठं शून्य काढलं तरी ते शून्यच. टिकलीएवढं शून्य, भाकरीएवढं शून्य, गाडीच्या चाकाएवढं शून्य....

अशी उदाहरणं देत महाराज श्रोत्यांना समजावून सांगत होते.

एक तार्किक होते.

नेहमी प्रश्न विचारायचे. शंका उपस्थित करायचे. महाराज त्यांना उत्तरं चपखल उदाहरणांसहित द्यायचे.

आजच्या प्रवचनानंतर या तार्किकांनी महाराजांना विचारलंच.

'आपण सांगितलं पूर्णाकडून पूर्णाकडे... पण हे पटत नाही. खूप

विचार केला. पण आपलं जीवन पूर्णाकडून पूर्णाकडे कसं... अहो किती अपूर्णता असते जीवनात. अपूर्णता असल्याशिवाय विकासक्रम शक्य आहे का?'

ब्रम्हानंद महाराज म्हणाले....

"मी आपणाला समजावून सांगतो. पण त्यासाठी मला तुमचं सहकार्य हव."

"सांगा महाराज. मी काय करू?"

"तुमच्यापाशी तुमच्या बालपणापासूनची विविध छायाचित्रं असतील. ती घेऊन या."

"हो येतो की, माझ्याकडं अल्बमच आहे"

दुसऱ्या दिवशी हे तर्कपंडित आपल्या बालपणापासूनच्या विविध छायाचित्रांचा अल्बम घेऊन आले. एकेक चित्र दाखवू लागले.

महाराजांनी विचारलं, "हा कितव्या वर्षीचा फोटो?"

"मी ६ महिन्यांचा होतो तेव्हाचा."

"हा कितव्या वर्षीचा?"

"मी ६ वर्षांचा होतो तेव्हाचा. हा ६० व्या वर्षीचा"

ब्रह्मानंद महाराज हसले त्यांनी विचारलं,

"तुम्हाला ६ महिन्यांचे असताना सर्व अवयव दिसतात. ६ वर्षांचे असतानाही तेच दिसतात. ६० व्या वर्षीही ते दिसतात. आता थोडे कृश दिसता इतकेच."

"म्हणजे काय महाराज?"

"अहो, तुम्ही जन्माला आलात... जीवन जन्मला.. तो पूर्ण होता. हात आणि पाय नंतर फुटले असं नाही. डोळे नंतर आले असं नाही. तुम्ही लहान असतानाही पूर्ण होता. मोठे झालात तेव्हाही पूर्णच होता. तुमच्या विकासाची प्रक्रिया पूर्णाकडून पूर्णाकडे होती. हेच मला सांगायचं होतं." तर्कपंडित काय समजायचं ते समजले आणि खाली मान घालून निघून गेले.

■ ■ ■

# ७. भक्तीचा पाऊस

संन्यासी म्हणाला, "तुम्ही यज्ञ केलात. पण कोरडे कर्मकांड केलेत. एकट्या शंकरची गाढ श्रद्धा होती की पाऊस पडेलच म्हणून! तो इरलं घेऊन निघाला. त्याच्या भक्तीचा पाऊस पडला. गावकरी स्तंभित झाले."

आटपाटनगराची कहाणी. नगराच्या परिसरात त्यावर्षी पाऊसच पडला नाही. जमिनीला भेगा पडलेल्या. तोंडं वासून भूमी पाण्याची वाट बघत होती. गुरं-ढोरं पाण्याविना तडफडत होती. घडाभर पाण्यासाठी माणसं एकमेकांशी भांडू लागली होती.

मग लोकांनी ठरवलं की वरुणाला साकडं घालायचं. वरुणदेवाची आराधना करायची. त्यासाठी यज्ञ करायचा. म्हणजे वरुणदेव प्रसन्न होईल. गावाच्या शिवेवर शिवाचं एक सुंदर मंदिर होतं. या मंदिरात यज्ञ करायचं ठरलं. लहान-थोर, स्त्रीपुरुष, सगळे गावकरी यज्ञासाठी जमा झाले. यज्ञकुंड पेटलं. हवन सुरू झालं.

जोराजोरात मंत्र म्हटले जात होते. गावकरी लोटांगण घालून आराधना करीत होते. यज्ञाच्या ज्वाळा आभाळाला भिडत होत्या. आणि गावकरी पाण्यासाठी आसुसल्या नजरेनं त्या ज्वाळांकडं बघत होते.

पण पाऊस येत नव्हता.

मग आणखी जोरजोरानं मंत्रपठण सुरू झालं.

यज्ञकुंडातील ज्वाळा हवनामुळं आणखीच भडकू लागल्या. तरीही वरुणदेव प्रसन्न होण्याचं चिन्ह दिसेना.

ऐंशी वर्षांचे एक म्हातारबुवा कडाडले ...

"गावात जा, घराघरात जा, घरात कुणीही थांबायचं नाही म्हणावं. सगळ्यांनी यज्ञाला या तरच पाऊस पडेल."

मग दोनपाच दांडगेश्वर गावात गेले. त्यांनी घरी थांबलेल्या वृद्धांना आणि लहान मुलांनाही बाहेर काढलं. यज्ञस्थळी आणलं. शंकर नावाचा एक लहान मुलगा अभ्यास करीत होता. त्यालाही त्यांनी पुस्तक बंद करून यज्ञस्थळी यायला लावलं.

शंकर उठला. त्यानं बरोबर इरलं घेतलं आणि तो निघाला. बाहेर सर्वत्र कडकडीत ऊन होतं आणि शंकरनं इरलं घेतलं होतं. ते बघून लोक शंकरला हसले. म्हणाले...

"काय रे शंकर, कडाक्याचं ऊन आहे. इरलं कशाला घेतलंस?"

"आपण पावसासाठी वरुणदेवाचा यज्ञ करतोय ना? मग आता पाऊस पडेल. येताना मी भिजणार नाही का? म्हणून इरलं घेतलंय."

शंकर यज्ञस्थळी आला... त्याच्या खांद्याला इरलं होतं.. आणि काय आश्चर्य... आभाळात ढग जमून आले. विजा कडाडू लागल्या. आभाळ झाकोळलं. आणि क्षणार्धात टपोरे थेंब पृथ्वीवर आदळू लागले. शंकरनं इरलं पांघरलं आणि तो भरले ओढे, नाले पार करीत घरी आला. विहिरी भरल्या, तळी भरली... गाव सुखी झाला.

काही दिवसांनी गावात एक संन्यासी आला. ज्ञानी होता. त्याला लोकांनी यज्ञाची व शंकरच्या इरल्याची गोष्ट सांगितली. संन्यासी म्हणाला, "तुम्ही यज्ञ केलात. पण कोरडे कर्मकांड केलेत. एकट्या शंकरची गाढ श्रद्धा होती की पाऊस पडलेच म्हणून! तो इरलं घेऊन निघाला. त्याच्या भक्तीचा पाऊस पडला."गावकरी स्तंभित झाले.

■ ■ ■

# ८. गुरूभक्ती

"गुरुजी, पुन्हा माझ्या हातून अशी चूक झाली आणि तुम्हाला मला शिक्षा करावी असं वाटलं तर एक करा..."

"काय करू?" गुरुजींनी कुतुहलानं विचारलं.

"तुम्ही दुसऱ्या कोणाच्या तरी करवी मला शिक्षा करा. मला शिक्षा करताना तुमचे हात दुखू नयेत अशी माझी इच्छा आहे."

गुरुजी शिष्याच्या या भक्तीनं भारावून गेले. हाच दयानंद पुढं महर्षी दयानंद या नावानं प्रसिद्ध झाला.

स्वामी दयानंद हे महान तत्त्ववेत्ते होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात त्यांनी केलेलं कार्य सवश्रृत आहे. बालपणी दयानंद एका आश्रामात राहून विद्या संपादन करीत होते. आश्रमाचे गुरुजी तापट, कडक होते. ते कठोर शिस्तीचे भोक्ते होते. आश्रमात सर्वत्र स्वच्छता असली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता.

आश्रमाच्या आवारात केरकचरा असलेला गुरुजींना मुळीच खपत नसे. आश्रमातील सर्व दैनंदिन कामे शिष्यच करीत. एकेक शिष्याला एकेक काम वाटून दिले होते. कुणी वनातून लाकडें आणीत असे. कुणी पूजेसाठी फुलं-पत्री आणीत असे. कुणी पाकशाळेत मदत करीत असे. स्वामी दयानंद यांच्याकडे आश्रमाच्या एका भागाचा केर काढण्याचं काम होतं. दयानंद कामसू होता. रोज वेतानं  तो खूपच दमला होता. म्हणून केर काढायचा राहिला. खरं तर कचरा होता असं नव्हे. पण केर काढायचा राहिंला हे खरं.

गुरुजी आले. गुरुजी आश्रमाच्या आवारात खडावा वापरत नसत. ते अनवाणीच हिंडत.

गुरुजींच्या पायाला एक खडा लागला. गुरुजी कळवळले. त्यांनी अवतीभवती पाहिलं...

त्यांचे डोळे रागानं लाल झाले. केरकचरा होता. केर काढला नव्हता हे त्यांच्या ध्यानी आलं. संतप्त गुरुजींनी करड्या आवाजात दयानंदाला हाक मारली.

"दयानंद."

"प्रणाम गुरुजी" दयानंत विनम्रतेनं म्हणाला.

आणि गुरुजींनी हातातल्या दंडानं दयानंदाला मारायला सुरुवात केली. बाकीचे शिष्य बघूनच भयभीत झाले.

गुरुजी मारत हाते. दयानंद हू कीचू न करता मार खात हाता. गुरुजीच मारून दमले. त्यांनी दंड फेकून दिला. आणि ते आसनावर जाऊन बसले.

अंगावर वळ उठलेला दयानंद गुरुजींजवळ गेला आणि त्यांचे पाय चेपत म्हणाला...

"गुरुजी,पुन्हा चूक होणार नाही. पण माझी एक विनंती आहे."

"कसली विनंती?" गुरुजींनी आश्चर्यानं विचारलं.

"गुरुजी, पुन्हा मला माझ्या हातून अशी चूक झाली आणि तुम्हाला मला शिक्षा करावी असं वाटलं तर एक करा...."

"काय करू?" गुरुजींनी कुतुहलानं विचारलं.

"तुम्ही दुसऱ्या कोणाच्या तरी करवी मला शिक्षा करा. मला शिक्षा करताना तुमचे हात दुखू नयेत अशी माझी इच्छा आहे."

गुरुजी शिष्याच्या भक्तीनं भारावून गेले. हाच दयानंद पुढं महर्षी दयानंद या नावानं प्रसिद्ध झाला.

■ ■ ■

# ९. मजबूत किल्ला

"संन्याशीबाबा, तू ज्या किल्ल्यावर जाणार आहेस तो कुठं आहे ते आम्हाला सांग." "दरोडेखोर म्हणाले. मित्रांनो तो किल्ला इथं माझ्याजवळच आहे." "माझं हृदय. माझा आत्मा."

"म्हणजे? अरे, माझ्यावर कुणी हल्ला केला तर माझं शरीर त्याला घायाळ करता येईल. पण माझा आत्मा? तो मजबूत किल्ल्यासारखाच आहे. मी आत्मस्वरूपातच राहीन. देहस्वरूप नष्ट होईल." दरोडेखोर खाली माना घालून निघून गेले.

कठोर तपसाधना करणारे एक विरागी साधू होते. निर्मोही, नि:स्पृह म्हणून त्यांची ख्याती होती. गावाशेजारीच अरण्यात ते राहात असत. लोक त्यांच्याकडं आले तर त्यांच्या प्रश्नाचं समाधान करण्यासाठी ते लोकांशी बोलत आणि त्याचं प्रबोधन करीत. साधुमहाराजांच्या शब्दांनी लोकांना आनंद होत असे. ते कोणाकडूनही काही घेत नसत.

अशीच एक रात्र हाती.

साधुमहाराज आपल्या झापेडीसमोरच्या पारावर झाडाखाली बसले होते. आसपासचे पंचक्रोशीतले ग्रामस्थ त्यांच्यासमोर बसले होते. सुखसंवाद सुरू होता. ग्रामस्थांची साधुमहाराजांवर भक्ती असल्यामुळे त्यातला एक ग्रामस्थ साधुमहाराजांना म्हणाला,

"महाराज, आपण अशा घोर अरण्यात राहता. एकटे आहात. आपण असं राहू नये असं आम्हला वाटतं. त्यापेक्षा गावातील मंदिरात आपण यावं. आम्ही आपली चोख व्यवस्था तेथे करू."

"मित्रा, तुझी सदिच्छा मी समजतो. पण अटन आणि विजन हेच साधूचं वैशिष्ट्य असतं. मी इथं विजनवासातच बरा आहे." साधू म्हणाले.

"महाराज, एक विचारू?" एका ग्रामस्थानं विचारलं.

"हो विचार ना. मोकळेपणानं विचार."

"महाराज, काही दुष्ट प्रवृत्तीची माणसं असतात. तुम्हाला एकटे गाठून या दुष्टांनी तुमच्यावर हल्ला केला तर तुम्ही काय कराल?"

साधुमहाराज किंचितसं हसले आणि म्हणाले,

"माझ्यावर दुष्ट लोकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर मी काय करेन सांगू?... मी एका मज़बूत किल्ल्याच्या आश्रयाला जाईन. असा किल्ला मला माहित आहे. तिथं या दुष्ट लोकांचं काहीच चालणार नाही."

रात्र फार झाली होती. ग्रामस्थ निघून गेले. पण ग्रामस्थांचा आणि या साधुमहाराजांचा हा संवाद अरण्यात लपून बसलेल्या काही दरोडेखोरांनी ऐकला.

दरोडेखोर पुढं आले. त्यांनी साधुमहाराजांना गराडा घातला आणि त्यांच्यातला एकजण दरडावून म्हणाला,

"संन्यासीबाबा, तुला आम्ही काही करणार नाही. पण तो मजबूत किल्ला कुठं जवळ आहे ते आम्हाला दाखव. म्हणजे आम्ही त्या किल्ल्यावर स्वारी करून लूट घेऊन जाऊ...."

साधुमहाराज जोरानं हसू लागले.

"ए फटिंगबाबा, हसतोस कशाला? तू ज्या किल्ल्यावर जाणार आहेस तो कुठं आहे ते आम्हाला सांग."

"मित्रांनो, तो किल्ला इथं माझ्याजवळ आहे."

"म्हणजे?"

"माझं हृदय. माझा आत्मा."

"संन्याशीबाबा नीट सांगा."

"अरे, माझ्यावर कुणी हल्ला केला तर माझं शरीर त्याला घायाळ करता येईल. पण माझा आत्मा? तो मजबूत किल्ल्यासारखाच आहे. मी आत्मस्वरूपातच राहीन. देहस्वरूप नष्ट होईल." दरोडेखोर खाली माना घालून निघून गेले.

■ ■ ■

# १०. नश्वर ते सुंदर

'नश्वर ते अधिक सुंदर असतं.' स्वामीजींच्या या विधानानं सारे शिष्यवर स्तंभित झाले. कारण आतापर्यंतच्या तत्त्वविवेचनात नश्वरतेबद्दल जे जे बोलले गेले ते असेच की नश्वर हे त्याज्य आहे. आणि आज पहावे तर स्वामीजी सांगतात की नश्वर ते अधिक सुंदर...

हिमालयाच्या कुशीत अनेक साधुसंन्यासी आश्रमवासी आहेत. या आश्रमात गुरुकुलासारखे राहून ज्ञानसाधना करणारे शिष्यही आहेत. असाच एक आश्रम स्वामी अखंडानंद यांचा. रोज सकाळी सूर्योदयापासून माध्यान्ह घटिकेपर्यंत स्वामीजी शिष्यांचे प्रबोधन करीत. स्वामीजींचा भर प्रवचन-पद्धतीऐवजी प्रश्नपद्धतीवर अधिक होता.

विवेचनाच्या ओघात स्वामीजी एकदा म्हणाले...

'नश्वर ते अधिक सुंदर असतं'

स्वामीजींच्या या विधानानं सारे शिष्यवर स्तंभित झाले. कारण आतापर्यंतच्या तत्त्वविवेचनात नश्वरतेबद्दल जे जे बोलले गेले ते असेच की नश्वर हे त्याज्य आहे. आणि आज पहावे तर स्वामीजी सांगतात की नश्वर ते अधिक सुंदर....

दुसऱ्या दिवशी एका जिज्ञासून शिष्यानं स्वामीजींना विचारलंच. स्वामीजी नश्वर ते अधिक सुंदर असं आपण सांगितल्यानं आम्ही गोंधळून गेलो आहोत. कृपा करून आम्हाला समजावून सांगा.'

स्वामीजी हसले आणि म्हणाले...

'या गहन तत्त्वाचं विवेचन मी सोदाहरणच करेन आणि सांगेन.'

आश्रमातील शिष्यवर निरनिराळ्या कलाकौशल्यांमध्ये प्रविण होते. आश्रमाभोवती शिष्यांनी वृक्षराजी, लताकुंज, फुलझाडे वाढविली होती. त्यात गुलाबाची झाडंही होती. झाडांना गेंददार गुलाब आले होते. एका

शिष्याला कागदाची फार सुंदर फुलं तयार करता येत होती. त्यांनी त्याला सांगितलं.

या गेंददार गुलाबपुष्पासारखी, त्याच रंगाची व आकाराची फुलं तयार करून आण. शिष्यानं गेंददार कागदी फुलांचा गुच्छ तयार केला. मग स्वामीजींनी दुसऱ्या एका शिष्याला खऱ्या गुलाबांचा गुच्छ तयार करून घेऊन यायला सांगितलं.

मग त्यादिवशीचं प्रवचन सुरू झालं. सारे शिष्यवर ऐकत होते. एका बाजूला कागदी फुलांचा गुच्छ होता, दुसऱ्या बाजूला खऱ्या फुलांचा गुच्छ होता. दोन्ही गुच्छ दिसायला सारखेच आणि सुंदर दिसत होते.

स्वामीजींनी त्या जिज्ञासू शिष्याला विचारलं...

'शिष्यवरा, या दोनही गुच्छातला कोणता गुच्छ अधिक टिकेल?'

'अर्थातच कागदी फुलांचा'

'आणि दुसरा?'

''तो तर लवकरच सुकून, वाळून जाईल,

'मग गंध नसलेली फुलं सुंदर की गंध असलेली फुलं सुंदर?'

'अर्थातच गंध असलेली'

'ती तर लवकर सुकून वाळून जाणार. ती नश्वर आहेत. तरीही अधिक सुंदर आहेत. म्हणून म्हणतो नश्वर तेही सुंदर असतं.'

सारे शिष्यवर नवे तत्त्व समजल्यामुळे समाधानी झाले.

■ ■ ■

# ११. स्वार्थी प्रेम

टिकमदासांचा चेहरा पुन्हा उजळला. हवेलीवरचं प्रेम तसंच राहिलं. त्यांना तिप्पट किंमत खुणावू लागली. भक्तीपेक्षा स्वार्थ मोलाचा ठरला. कुठं गेलं टिकमदासांचं हवेलीवरचं प्रेम..?

टिकमदास एक उद्योगी गृहस्थ होते. शिक्षण फार झालेलं नव्हतं. पण वयाच्या बारा-पंधरा वर्षापासूनच त्यांनी कंगवे, फण्या विकण्याचा उद्योग सुरू केला. रस्त्यावर उभं राहून, घरोघरी फिरून विक्री करीत. दहा वर्षांत त्यांनी एक दुकान घेतलं आणि आणखी दहा वर्षांनी ते एका फॅक्टरीचे मालक झाले. धंदा बरकतीला आला. टिकमदासांना तीन मुलगे. टिकमदासांनी भलं मोठं घर बांधलं. हवेलीच ती. देखणी रचना, उत्तम आकर्षक रंग, सागवानी लाकडाचे सुंदर दरवाजे. दूरवरून पाहिलं तरी टिकमदासांची सुखशांती इमारत डोळ्यात भरायची.

टिकमदास महिनाभर तीर्थयात्रेला गेले. आता निवांतपणा होता. तीनही मुलं त्यांचा व्यवसाय सांभाळत होती. महिन्याभराने टिकमदास घरी परत आले आणि पाहतो तो काय? वेळ सायंकाळची होती. आभाळात तांबूस रंग पसरला होता. पण त्यापेक्षा अधिक तांबड्या लाला भडकत्या ज्वाळांनी टिकमदासांच्या डोळ्यांवर अंधारी आली.

कसल्या ज्वाळा होत्या त्या?

टिकमदासांची हवेली पेटली होती. डोळ्यांदेखत तो देखणा इमला आगीच्या भक्षस्थानी पडला होता. नोकरचाकर, घरातली माणसं, मुलं आग विझवण्याचा शर्थीनं प्रयत्न करीत होती. एवढ्यात थोरला मुलगा आला. वडिलांना हंबरडा फोडून रडताना पाहून तो म्हणाला, 'बाबा, रडू नका. तुम्हाला वाईट वाटणार हे स्वाभाविक आहे. पण तीनच दिवसांपूर्वी मी ही हवेली विकून टाकली. तिप्पट किंमत आली. मग वाईट वाटायचं कारण काय?'

टिकमदासांच्या चेहऱ्यावरचा शोक मावळला. तिप्पट किंमत आली म्हटल्यावर ते म्हणाले,'शाब्बास पोरा, हुशार आहेस.' एवढ्यात मधला मुलगा आला. तो म्हणाला, 'बाबा, हा सांगतो ते इतकं खरं नाही. हवेली विकण्याचं बोलणं झालंय हे खरं. विसार हाती पडलाय पण सगळी रक्कम आली नाही. आता कोण ती रक्कम देईल?' टिकमदास पुन्हा गडबडले. रडू लागले. पोरांनो, माझं फार प्रेम होतं रे या हवेलीवर. असं म्हणू लागले. एवढ्यात तिसरा मुलगा आला. म्हणाला, बाबा सगळे पैसे आले नाहीत हे खरं. पण विकत घेणारा आताच मला भेटला. तो नेक माणूस. तो म्हणाला, हा व्यवहार मी पुरा करीन. शब्दाला जागलं पाहिजे.' टिकमदासांचा चेहरा पुन्हा उजळला. हवेलीवरचं प्रेम तसंच राहिलं. त्यांना तिप्पट किंमत खुणावू लागली. भक्तीपेक्षा स्वार्थ मोलाचा ठरला. कुठं गेलं टिकमदासांचं हवेलीवरचं प्रेम?

■■■

# १२. निर्वैर भूमी

एक बेडकी पिलाला जन्म देत होती. आणि... एका नागिणीनं तिच्यावर फणा धरला होता. बेडकीला सावली दिली होती. आधार दिला होता. नव्या बाळाला या जगात येताना आधार दिला होता. बेडूक हे नागाचं सावज. पण सावजालाच शिकाऱ्यानं आधार दिला... शकंराचार्य अंतर्मुख झाले. बस... ब्रह्म सत्य, जग मिथ्या... हा आपला सिद्धांत सांगण्यास शृंगेरीच्या भूमीपासून सुरुवात केली.

श्रीमद् आद्य शकंराचार्य हे द्रष्टे तत्त्वज्ञानी, फिरते सुधारक, आणि कळकळीचे समाजहितचिंतक होते. केरळात कालडी या गावी त्यांचा जन्म झाला. पारंपरिक शिक्षण घेत असतानाच त्यांना संन्यास घेण्याची इच्छा झाली. आईला मात्र मुलानं संन्यास घेऊ नये असं वाटत होतं. गोविंदाचार्य या यतीना त्यांनी गुरू केलं. आणि त्यांच्याकडून तत्त्वबोध घेऊन देशाटनासाठी बाहेर पडले. उत्तर आयुष्यात ज्ञानमार्गी असलेले शंकराचार्य बालपणी भक्तिमार्गी होते. बालपणी जगदंबेची पूजा केल्यावर जगदंबेने नैवेद्याचे दूध प्राशन करावे यासाठी शंकराचार्य हटून बसले. याच शंकराचार्यांनी पुढे अनेक विद्वानांशी सखोल चर्चा करून स्वतःची मते मांडली. प्रस्थापित केली. 'शंकरभाष्य' केले. त्याकाळात सर्वसामान्य माणूस धर्मग्लानीत होता. त्याची बुद्धी कुंठित झाली होती धर्मचक्रप्रवर्तन करून माणसाला धर्मप्रवण बनविण्यासाठी शंकराचार्यांना वेगळ्या उपक्रमाची आवश्यकता वाटली.

म्हणून मग त्यांनी भारताच्या चार दिशांना चार धर्मपीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. चार धाम! चार प्रबोधन शाळा, चार पीठ, द्वार महाद्वार... असं त्या कार्याचं स्वरूप होतं. पण अजून सर्व ठिकाणांची निश्चिती झालेली नव्हती. भारतभर यात्रा करून शंकराचार्यांनी निरीक्षण केलं होतं.

एकदा असेच ते शृंगेरीला होते. शृंगेरी हे तसं त्यांचं आवडतं ठिकाण होतं. शंकराचार्य संध्येला बसले होते. संध्या संपली. आणि समोर बघतात तर एका झाडाआड एक विलक्षण दृश्य त्यांना बघायला मिळालं. कोणतं दृश्य होतं ते?

एक बेडकी पिलाला जन्म देत होती. बाळंत होत होती.

आणि...

एका नागिणीनं तिच्यावर फणा धरला होता. बेडकीला सावली दिली होती. आधार दिला होता. नव्या बाळाला या जगात येताना आधार दिला होता.

शंकराचार्य या दृश्यानं अधिक अंतर्मुख झाले. बेडून हे नागचं खाद्य. नागाचं सावज. पण सावजालाच शिकाऱ्यानं आधार दिला.. बस.. ब्रह्म सत्य; जग मिथ्या... हा आपला सिद्धांत सांगण्याच्या कार्याला सुरुवात करण्यासाठी ही भूमी... शृंगेरीची भूमी अगदी योग्य आहे. कारण या भूमीत वैर नाही, मत्सर नाही, स्वार्थ नाही. जिवाशिवाची एकता आहे. हे त्या दृश्यानं जाणवलं आणि मग... पूज्य शंकराचार्यांनी शृंगेरीला प्रथममठाची स्थापना केली.

■ ■ ■

# १३. महिषब्रह्माची उपासना .....

'गुरुदेव, मी परब्रह्माची उपासना करायला निघालो आणि ध्यान करू लागलो तर सारखी घरची ती म्हैस डोळ्यांसमोर येते.' शंकराचार्यांचा शिष्य त्यांना म्हणाला. 'वत्सा, अरे मग सोपं आहे. तुला वाट सापडली. मार्ग मिळाला.' ते कसं काय गुरुवर्य?' 'अरे, या विश्वातील सर्व घटक या ना त्या रूपानं परब्रह्माचे अंशच आहेत. परब्रह्म ते वेगळं काय आहे? तू महिषब्रह्माचीच उपासना कर, त्याचंच ध्यान कर. तुला परब्रह्माची वाट मिळेल.....'

श्रीमद् आद्य शंकराचार्य हे क्रांतिकारक, धर्मप्रणेते होते. बालवयातच दिव्यज्ञानाची प्रचिती घेऊन त्यांनी काशीचा रस्ता धरला आणि पुढे चार पीठांची स्थापना करून धर्मकार्याचा ध्वज उंचावला. स्वत: कठोर तपसाधना करणारे शंकराचार्य शिष्य अथवा साधक यांच्याबाबतीत मात्र मृदू व हळवे होऊन त्यांना मार्गदर्शन करीत. त्यांच्याकडं मार्गदर्शनासाठी येणाऱ्या साधकांमध्ये सारेच संन्यासी असत. यातले काही तरुण संन्यासी मुक्तावस्थेला जाताना त्यांना फारच अवघड वाटू लागे आणि मग शंकराचार्य या कंटकाकीर्ण मार्गावरील अडथळे दूर करून त्यांना स्वच्छ प्रकाशवाटांचे दर्शन देत.

असाच एक संन्यासी होता.

तरुण होता, साधक होता. शास्त्राभ्यास संपवून अध्यात्माची खरीखुरी वाटचाल करण्यासाठी तो शंकराचार्यांकडे आला.

हा तरुण साधक जेव्हा आपल्या घरातून बाहेर पडला, कुटुंबाचे बंध मागे ठेवून आला तेव्हा त्याला असे वाटले होते की, आपण तर ब्रह्मचारी आहोत. आपल्यावर कसलीच जबाबदारी नाही. आपण सहजपण साधना करु, पण नाही. त्याचा लवकरच भ्रमनिरास झाला. कौटुंबिक जीवनातल्या अनेक घटना, प्रसंग, व्यक्ती, स्थळे, आप्त यांच्या आठवणी मनात गर्दी

करू लागल्या. चित्त एकाग्र होईना आणि विशेष म्हणजे त्याला आपल्या घरच्या एका म्हशीची सारखी आठवण होऊ लागली. तो बालपणापासून त्या म्हशीला वैरण घालायचा, धार काढायचा आणि योगायोगाची गोष्ट म्हणजे, संन्यात घेतला तरी तो तरुण संन्यासी त्या म्हशीला विसरू शकला नाही.

श्रीमद् शंकराचार्यांनी त्या तरुण संन्याशाला एका गुहेत बसून मंत्रसाधना करण्यास सांगितले होते. पण दरवेळी मंत्रपठण करताना त्याच्या डोळ्यांसमोर ती म्हैस येई आणि एकाग्रतेचा भंग होई.

मग तो शिष्य अगतिकतेनं गुरु शंकराचार्य यांच्याकडं आला.

'प्रणाम गुरुदेव, माझ्या साधनेत व्यत्यय येत आहे.' तो म्हणाला.

'का बरं?' शंकराचार्यांनी आश्चर्यानं विचारलं.

'गुरुदेव, मी परब्रह्माची उपासना करायला निघालो आणि ध्यान करू लागतो तर सारखी घरची ती म्हैस डोळ्यांसमोर येते.'

'वत्सा, अरे मग सोपं आहे. तुला वाट सापडली. मार्ग मिळाला.'

'ते कसं काय गुरुवर्य?'

'अरे, या विश्वातील सर्व घटक या ना त्या रुपानं परब्रह्माचे अंशच आहेत. परब्रह्म ते वेगळं काय आहे? तू महिषब्रह्माचीच उपासना कर, त्याचंच ध्यान कर. तुला परब्रह्माची वाट मिळेल.'

शिष्यानं तसंच केलं. तो उत्तम साधक झाला.

■ ■ ■

# १४. सदा ध्यान भगवंताचे

'महाराज, मी सतत भगवंताच्या ध्यानातच असते. ते कसं काय? हे बघा, तुम्ही आता येतानां मी तुम्हाला मन लावून नमस्कार केला. पण माझं ध्यान डोक्यावरच्या हंड्याकडं होतं. म्हणून मी तोल साधू शकले. रामनामाबाबत माझं तसंच आहे. कामात असले तरी नामात असते.

एक छोटंसं टुमदार गाव होतं. गावात अनेक घरं होती. कुणी शेतकरी, कुणी वाणी, कुणी शिक्षक, कुणी चाकर..... शेतकऱ्यांची घरं खूप होती. यमुनाबाई नावाची एक स्त्री. कुटुंब शेतकऱ्याचं. नवरा साप चावून गेला. मुलं थोडी मोठी झाल्यावर शेती करू लागली. पण तोपर्यंत मुलांचा सांभाळ करणं आणि शेतीत कष्ट उपसणं अशा सर्व गोष्टी यमुनाबाईलाच कराव्या लागत. गावात कधीकधी कथाकीर्तन असलं तर सगळे गावकरी जात. गावातल्या बायाबापड्याही जात. पण यमुनाबाईला मात्र वेळ होत नसे. कारण दिवसरात्र घरातले आणि शेतातले काम तिला करावे लागे. यमुनाबाईला कीर्तन ऐकायची इच्छा असली तरी तिला वेळ होत नसे.

आता मात्र संसाराचा ताप थोडा कमी झाला होता. जबाबदाऱ्या कमी झाल्या होत्या. तरीसुद्धा आणखी एक जबाबदारी वाढली होती. यमुनाबाईच्या नवऱ्यानं गावाशेजारच्या डोंगराच्या पायथ्याशी एक गायरान घेतलं होतं. तिथं गुरांची राखोळी करायची. घरी बसण्यापेक्षा म्हशी चरायला घेऊन जायची यमुनाबाई.

आणि गावात पाण्याची टंचाई निर्माण झाली होती.

यमुनाबाई रानात म्हशी चरायला जायची तेव्हा येताना पाणवठ्यावरून एकावर एक तीन हंड्यांची उतरंड डोक्यावरून घेऊन यायची. पन्नाशीला आलेली यमुनाबाई काटक होती. ती काम आणि राम एकच मानायची.

त्या गावात काही काळासाठी रामदेवबाबा नावाचे एक सत्पुरुष आले होते. रामदेवबाबा सतत रामनाम घेत असत.

एकदा रामदेवबाबा मंदिरातील पूजाअर्चा आटोपून पाणवठ्याच्या रस्त्याने येत होते. समोरून यमुनाबाई येत होत्या. त्यांच्या डोक्यावर हंडे होतेच. समोरून रामदेवबाबा येताना पाहून यमुनाबाई किंचित थांबली आणि अगदी थोडं झुकून तिनं त्यांना प्रणाम केला.

'बाई, तुम्ही सतत संसाराच्या चिंतेत असता. काम करता. केव्हातरी सवड काढून रामनाम घेत जा.' रामदेवबाबा म्हणाले.

यमुनाबाई किंचित थबकली आणि रामदेवबाबांना हसून म्हणाली,

"महाराज, मी सतत भगवंताच्या ध्यानातच असते."

'ते कसं काय?'

'हे बघा, तुम्ही आता येताना मी तुम्हाला मान लववून नमस्कार केला. पण माझं ध्यान डोक्यावरच्या हंड्यांकडं होतं. म्हणून मी तोल साधू शकले. रामनामाबाबत माझं तसंच आहे. कामात असले तरी नामात असते.' रामदेवबाबा संतोषानं हसले.

■ ■ ■

# १५. वारी : महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित

महाराष्ट्रातल्या गावागावांना, वाड्यावस्त्यांना, माणसा-मुलांना पंढरी नावाच्या हृदयसंस्थेतून शुद्ध भक्तिरसाचा पुरवठा होतो. आणि अशुद्ध रक्त तिथं शुद्ध केलं जातं. वासना गळून पडतात. अहंभावाला तिलांजली मिळते. मीपणाला मूठमाती मिळते. समत्वाची भावना निर्माण होते.

आभाळ गळू लागतं, विजा कडाडू लागतात आणि आषाढ बरसू लागतो. तेव्हा महाराष्ट्राच्या गावागावात वारीचं वातावरण निर्माण होत असतं. ज्ञानदेवांनी ज्या भागवत धर्माचा पाया रचला त्याचा तुकोबांनी कळस रचिला.... या भागवत धर्माचं एक ब्रीद म्हणजे पंढरीची वारी.

वारी म्हणजे काय? वारी ही केवळ पंढरपूरपर्यंतचा प्रवास नव्हे. वारी ही केवळ मैलोगणती केलेली पायपीट नव्हे. वारी हे केवळ स्थलांतर. वारी ही फक्त क्षेत्रभेट नव्हे. वारी हा अभूतपूर्व अनुभवसोहळा असतो. महाराष्ट्राच्या गावागावातून या वारीसाठी दिंड्या निघतात. छोटे छोटे ओहोळ एकत्र होऊन नदी होते. आणि अशा नद्या एकत्र येऊन सागराला मिळतात तशा महाराष्ट्राच्या हजारो दिंड्या या पंढरीच्या भक्तिसागरात येऊन मिळतात आणि पाहता पाहता चंद्रभागेच्या तीरी जनसागराच्या लाटा उफाळू लागतात.

ग्यानबा तुकाराम हा वारकऱ्यांचा बीजाक्षरमंत्र आहे. या मंत्राचं सामर्थ्य एवढं मोठं आहे की थकित पायांना बळ मिळून ते पाय धावू लागतात. मरगळलेल्या मनांना उभारी मिळून त्यांना भक्तिरसामुळे टवटवी प्राप्त होते आणि संसाराच्या व्यवहारी वाटा मागे टाकून कैवल्याच्या शोधाची वाट दिसू लागते.

वारीचं महत्त्वाचं वैशिष्ट्य असं की या वारीत सामाजिक समरसता असते. विठुरायाचे अठरापगड जातींचे भक्त होते. त्यात ज्ञानेश्वर देशस्थ ब्राह्मण, तुकाराम वाणी, नरहरी सोनार, सेना न्हावी, चोखा महार, सावता माळी, जगनाडे तेली असे सगळे होते. यांची जात कोणती? साळी,

माळी, लोहार, कोष्टी, ब्राह्मण, मराठा, महार, मांग? छे छे यांची जात एकच. हे सगळे भागवत, हे सगळे वारकरी. या सगळ्यांचं आडनाव एकच, भागवत. शरीरात ज्याप्रमाणे पायापासून डोक्यापर्यंत सगळ्या रक्तवाहिन्यांना हृदयापासून रक्तपुरवठा होतो त्याप्रमाणे महाराष्ट्रातल्या गावागावांना, वाड्यावस्त्यांना, माणसा-मुलांना पंढरी नावाच्या हृदयसंस्थेतून शुद्ध भक्तिरसाचा पुरवठा होतो आणि अशुद्ध रक्त तिथं शुद्ध केलं जातं. वासना गळून पडतात. अहंभावाला तिलांजली मिळते. मीपणाला मूठमाती मिळते. आणि एकत्वाची, ममत्त्वाची, समत्वाची भावना निर्माण झालेले वारकरी देहभान विसरून या भक्तिसोहळ्यात सामील होतात. वारी हे महाराष्ट्राचं सांस्कृतिक संचित आहे.

विदर्भातील पांढरकवड्याचा महाजन, कोल्हापुरातील रंकाळ्याचा पाटील, चिपळूणचा कोकणी, खानदेशचा लेवापाटील सगळे सगळे एकमेकांना उराउरी भेटतात. स्त्री-पुरुष, लहान-मोठा, गरीब-श्रीमंत हा भेद तिथं लवमात्र नसतो. कैवल्याच्या दर्शनासाठी या साऱ्यांचेच डोळे आतुरलेले असतात. वारकऱ्यांची दिंडी हा केवळ माणसांचा जथा नसतो तर तो विठुरायाच्या भक्तांचा, पंढरीनाथाच्या सोयऱ्यांचा समूह असतो.

वारीच्या निमित्तानं संसाराची काहीकाळ चिंता दूर ठेवून ओठी मंत्र येतात, गळे गाते होतात, वीणेच्या तारा झंकारू लागतात, टाळ गजर करू लागतात. थंड पालख्यांना पंख फुटतात आणि पावलांना गतीचे धुमारे फुटतात. जागोजागीच्या मुक्कामांतून समाजजीवनातील अधिसरस अधिक जोमाने वाहू लागतो आणि अवघ्या महाराष्ट्रात एक चैतन्यशील वातावरण निर्माण होतं.

ज्ञानोबा तुकाराम यांच्या पालख्या आळंदी आणि देहूहून निघतात आणि वाटेत शेकडो गावांतून त्यांना दिंड्या मिळून त्यांची पंढरीच्या वाटेवरची एक महादिंडी निर्माण होते. या महादिंडीत हजारो वारकरी सामील झालेले असले तरी ते स्वत:ला वेगळे न मानता त्या महादिंडीची वाटचाल सुरू असते. भजनं ऐकण्यासारखी असतात व वारकऱ्यांचा तो अथांग समूह पाहण्यासारखा असतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचं वैभव प्रतिवर्षी वर्धिष्णू होत आहे. आणि एकविसाव्या शतकातला महाराष्ट्र भक्तिरसाच्या अमृतात सुस्नात होत आहे.

■ ■ ■

# १६. देवाची निवड

सर्व राजकुमारांनी देवाकडे वर मागितले मात्र रतिदेवानं काहीच मागितलं नाही. देव म्हणाला, "रतिदेवा वर माग." रतिदेव म्हणाला, "देवा वर मागतो, न त्वहं कायमे राज्यं न स्वर्गं न पुनर्भवम कामये दु:ख तप्तानां प्राणीनाम् आर्तीनाशनम." (राज्य नको, स्वर्ग नको, मुक्ती नको, दु:खी जीवांचे दु:ख दूर करण्याचे सामर्थ्य दे.) देवानं रतिदेवाच्या वराची निवड केली. वर मिळाला. रतिदेव अमर झाला.

प्राचीन काळातील गोष्ट आहे. एका आश्रमात काही राजकुमार शिकत होते. खड्ग युद्धासारख्या विद्या तर ते शिकलेच. राज्यकारभाराचे धडेही त्यांना तिथे मिळाले. या सर्व राजकुमारांमध्ये भरत वंशातील रतिदेव नावाचा राजकुमार अध्ययन करीत होता. रतिदेव बुद्धिमान होता. सदाचरणी होता. चौसष्ट कला, अठरा विद्या यातील एखाद्या कलेत या विद्येत निपुण होण्यासाठी त्या आश्रमाचे गुरू विशेष प्रशिक्षण देत. पण त्याचबरोबर ध्यानधारणा, मननचिंतन यांचाही स्वाध्याय सर्व राजकुमारांना करावा लागे.

आश्रमाला लागूनच एक डोंगर होता. गुरुवर्यांनी सांगितलं की आता पुढील पंधरवडा या डोंगरातील गुहेत राहून सर्वांनी ईश्वरचिंतन करायचं. ध्यानधारणा करायची. एका शिष्यानं विचारलं. "गुरुवर्य, ईश्वरचिंतन केलं तरी ईश्वराची प्राप्ती होईल का?" "होईल, तुमची भक्ती इतकी निस्सीम असेल तर होईल." गुरू म्हणाले. मग सर्व राजकुमार डोंगरातील त्या विविध गुहांमध्ये ईश्वरचिंतन करू लागले. गुरुवर्यांनी दिलेलं मंत्रोच्चारण, जप, ध्यान, मौन असा सर्व क्रम होता. या सर्व राजकुमारांमध्ये रतिदेवही होताच. पंधरवडा संपत आला. तपाचं तेज सर्वांच्याच चेहेऱ्यावर दिसू लागलं.

ज्या शिष्यानं ईश्वराच्या दर्शनाविषयी गुरुवर्यांना विचारलं होतं तो मात्र

मनात म्हणत होता, 'अजून ईश्वरदर्शन झालं नाही.' गुरुवर्यांनी अंतर्ज्ञानानं जाणलं. मग ते सर्वांना म्हणाले, आता शेवटच्या रात्री एकत्र बसून चिंतन करा..... सर्व राजकुमार एकाच गुहेतील निरनिराळ्या शिलांवर चिंतनस्थ झाले. आणि काय आश्चर्य! मध्यरात्री गुहेत प्रकाश दिसू लागला. देव प्रसन्न झाला. डोळ्यांचं पारणं फिटलं. देवानं सांगितलं "राजकुमारांनो, मी तुमच्या तपानं प्रसन्न झालो आहे. तुम्ही सर्वजण वर मागा. मात्र मी एकाचीच निवड करणार आहे. ज्याचा वर मला सर्वश्रेष्ठ वाटेल त्याचाच वर मी पुरा करणार." कुणी राज्य मागितलं, कुणी धन मागितलं, कुणी आयुष्य मागितलं, कुणी अमरत्व मागितलं, रतिदेवानं काहीच मागितलं नाही. देव म्हणाला,"रतिदेवा वर माग." देव वर मागतो. न त्वहं कायमे राज्यं न स्वर्गं न पुनर्भवमकामये दु:ख तप्तानां प्राणीनाम आर्तीनाशनम"

(राज्य नको, स्वर्ग नको, मुक्ती नको, दु:खी जीवांचे दु:ख दूर करण्याचे सामर्थ्य दे) देवानं रतिदेवाच्या वराची निवड केली. वर मिळाला. रतिदेव अमर झाला.

■ ■ ■

# १७. मोक्ष

विठ्ठलमंदिराचा कळस दिसू लागला. विठोबानं हात जोडले. रखमानं हात जोडले. भक्तगणांची मांदियाळी होती. नामगजरानं अवघं आभाळ भरून गेलं होतं. रखमा आणि विठोबाला दमल्यासारखं वाटू लागलं. 'चल, चोखोबाच्या सावलीला बसू जरा....' दोघंही एकमेकांच्या खांद्यावर माना टाकून, डोळे मिटून बसले होते. बराच वेळ झाला. समोरच्या रांगेतल्या वारकऱ्यांनी पाहिलं. ते जवळ आले. मानेखाली हात दिला तसे दोघांचेही देह आडवे झाले. रखमा आणि विठोबा दोघंही मोक्षाला गेले होते.

रखमाबाई आणि विठोबा एक सुखी जोडपं होतं. वैराळवाडी या वैरण गावाल त्यांची उभी हयात गेली. काळ्या आईची सेवा करावी, दिवसभर शेतात राबावं आणि चार घास पोटात गेल्यावर गावातल्या विठ्ठलाचा परिपाठ होता. एक मुलगा गणपत आणि एक मुलगी जिजा. गणपत कर्ता झाला न् लगीन ठरायच्या आतच रानात त्याला साप चावला. तो देवाघरी गेला. जिजाला गलमेवाडीचं चांगलं स्थळ मिळालं. कधीमधी जिजा आपल्या दोन लहान पोरांना घेऊन माहेरी यायची. तेव्हा रखमा-विठोबाचं लहानसं घर गोकुळागत नांदतं व्हायचं. पण पुन्हा जिजाची पाठवणी झाली की तिच्या हुंदक्यांबरोबरच या घरालाही हुंदका यायचा. जगरहाटी अशीच असते,हे रखमा विठोबाला चांगलं माहित होतं. आता त्यांनी पंढरीला जाण्याचा परिपाठ ठेवला. दरवेळी शेजारच्या ढेबेवाडीच्या किसनबुवांची दिंडी निघायची. या दिंडीबरोबर दोघंही वारीला जाऊ लागले. साठी उलटेपर्यंत दोघांनाही काही वाटलं नाही. पण विठोबा आता सत्तरीचा झाला. रखमालाही साठी उलटून पाच वर्षं झाली. अलीकडं विठोबाला धाप लागू लागली. गावकरी म्हणू लागले.....

'विठोबा, आता वारीला जाणं पुरे करा; नाही सोसायचं तुम्हांला आता.'

'आता आमचं काय राहिलंय बाबांनो! पांडुरंगाच्या पायाशी आमचा मोक्ष!'

'पांडुरंगाच्या पायाशी मिळाला तर ठीकच. पण वाटेतच कुठे धडपडला तर आता म्हातारवयात हाडं खिळखिळी होतील.'

'न्हाई बा.... तसं काय बी व्हनार न्हाई. पांडुरंग आमची काळजी घील.' असं मुखानं पांडुरंगाचं नाव घेताना देहभान हरपून धाप वाढू लागली.

'रखमा, तू जातेस का माघारी? अगं मी असा. धाप लागलेला.

'धनी, मी माघारी जाऊ? मला धाप लागली तर तुमी जाल?' विठोबाचे खोल डोळे समाधानाने भरले.

'काय हुईल ते दोघांचं बरोबर हुईल. मोक्ष मिळाला तरी आणि नरक मिळाला तरी.... दोगं बरुबर राहू.'

विठ्ठलमंदिराचा कळस दिसू लागला. विठोबानं हात जोडले. रखमानं हात जोडले. भक्तगणांची मांदियाळी होती. नामगजरानं अवघं आभाळ भरून गेलं होतं. रखमा आणि विठोबाला दमल्यासारखं वाटू लागलं.

'चल, चोखोबाच्या सावलीला बसू जरा.'

दोघंही एकमेकांच्या खांद्यावर माना टाकून, डोळे मिटून बसले होते. बराच वेळ झाला. समोरच्या रांगेतल्या वारकऱ्यांनी पाहिलं.. ते जवळ आले. मानेखाली हात दिला तसे दोघांचेही देह आडवे झाले. रखमा आणि विठोबा दोघंही मोक्षाला गेले होते.

■ ■ ■

# १८. अपवित्र हात

त्यादिवशी प्रवचन करतानाच गुरु तेजबहादुर यांना घशाला कोरड पडली. गुरुंनी पाणी मागितलं. त्या धनिकाच्या मुलानं चांदीच्या पेल्यातून पाणी आणलं. गुरु तेजबहादुर यांनी त्या पेल्याला स्पर्शही केला नाही. धनिकानं पाणी पिण्याची विनंती केली. गुरू म्हणाले, 'अपवित्र हातांनी आणलेले पाणी मी पीत नाही. काम न करणारे हात अस्वच्छ अपवित्र असतात. धनिक काय ते समजला. नंतर एका मजुरानं पाणी आणलं. गुरू ते प्याले.

महान संत गुरु तेजबहादुर हे साक्षात्कारी संत होते. तसेच ते कर्मयोगीही होते. माणसाने कर्मठ असता कामा नये पण त्याने कर्मप्रवण असले पाहिजे असे ते नेहमी सांगत. भक्ती आणि कर्म या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे ते सांगत असत. असेच एकदा गुरु तेजबहादूर आपल्या गावात आले आहेत ही वार्ता सर्वत्र पसरली आणि घराघरातून लोक त्यांच्या दर्शनासाठी येऊ लागले. गावातील लोकांनी त्यांना विनंती केली-गावातच काही दिवस राहून प्रवचनं करावीत, प्रबोधन करावे. गुरूंनी लोकांची विनंती मान्य केली. एका धनिकाने आपल्या घरी राहण्याविषयी गुरुंना विनंती केली. तीही विनंती गुरुंनी मान्य केली.

त्या धनिकाच्या मोठ्या घराच्या विस्तीर्ण अंगणात मांडव घातला होता. गुरुंची प्रवचने तिथं होत होती. हजारो लोक या प्रवचनांचा लाभ घेत होते. तल्लीन होऊन श्रवणसुखाचा आनंद घेत होते. गुरु तेजबहादूर कर्म मार्गातूनच भक्तियोग कसा साधता येतो याविषयी विवेचन करीत होते.

प्रवचनसप्ताह संपत आला. शेवटचा दिवस. उद्यापासून प्रवचन नाही ही हुरहुर लोकांना लागली होती. शेवटच्या दिवशी एक गंमतीदार प्रसंग घडला.

त्यादिवशी प्रवचन करतानाच गुरु तेजबहादूर यांना घशाला कोरड पडली आहे असं वाटलं. नेहमीपेक्षा जरा जास्तच कोरड पडली होती. एरवी गुरु तेजबहादूर प्रवचनात पाण्याचा घोटही घेत नसत. गुरुंनी पाणी मागितले.

धनिकानं स्वत:च्या मुलाला पाणी आणायला सांगितलं. मुलानं चांदीच्या पेल्यातून पाणी आणलं. पेला समोर ठेवला. बराच वेळ झाला गुरु तेजबहादूर यांनी त्या पेल्याला स्पर्शही केला नाही. वाट पाहून शेवटी तो धनिक नम्रभावानं म्हणाला, 'आपणासाठी पाणी आणलंय. रौप्यपात्रातून आणलंय, घ्यावं.''

तरीही तेजबहादुरांनी पाणी घेतलं नाही. त्यानं पुन्हा आर्जवं केली तेव्हा गुरु तेजबहादुर किंचितसं हसले आणि म्हणाले, 'नाही, हे पाणी मी घेणार नाही.'

'का बरं गुरुवर्य?' कोणता अपराध घडला आमच्याकडून?'

'अपवित्र हातांनी आणलेलं पाणी मी पीत नाही.'

'महाराज, मुलाचे हात स्वच्छ आहेत. पवित्र आहेत.'

'काम न करणारे हात अस्वच्छ व अपवित्र असतात', गुरू म्हणाले.

धनिक समजायचं ते समजला. मग एका मजुरानं पाणी आणलं. गुरू ते प्याले. अशी श्रमांची महती!

■ ■ ■

# १९. तीन प्रश्न - एक उत्तर

तू जे सांगणार ते खरं नाही. सत्य नाही. ते बदनामी करणारं आहे आणि त्याचा मला काहीच लाभ नाही. मी ते ऐकणार नाही. तू सांगू नको.' स्वामी सत्यबोध यांच्या उद्गारांनी सत्यदीप स्तंभित झाला. त्यांच्या वैचारिक उंचीने तो भारावून गेला.

स्वामी सत्यबोध हे एक अलौकिक तत्त्वज्ञानी अभ्यासक होते. निरपेक्ष, निर्वैर जीवनप्रणालीमुळे ते सर्वांना प्रिय होते. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इ. षड्रिपूंच्या पलीकडे गेलेले स्वामी हे आदर्श मित्र, हितचिंतक, मार्गदर्शक या नात्याने सर्वदूर ख्यातनाम होते. कोणाबद्दलही पूर्वग्रहदोष मनात न बाळगता ते स्वच्छ मनाने विचार करीत असत. त्यामुळे स्वामीजींच्या विचारांना एक वेगळीच झळाळी प्राप्त झालेली असे. स्वामीजींचे अनेक चाहते. स्नेही होते. ते कधीकधी विचारविनिमयासाठी स्वामीजींकडे येत असत. असाच एक स्नेही आपल्या एका स्नेह्याबद्दल स्वामीजींना काही सांगायला आला होता. हा दुसरा स्नेहीसुद्धा स्वामीजींना माहीत होता. संवाद सुरू झाला. या स्नेह्याचं नाव होतं सत्यदीप.

'स्वामीजी, सत्यव्रताबद्दल अलीकडे मला काय काय ऐकायला मिळतं. 'सत्यदीप तेव्हा स्वामीजींनी सत्यदीपला मध्येच थांबवलं. ते त्याला म्हणाले,

'हे बघ मित्रा, सत्यदीपा, सत्यव्रताबद्दल तू जे ऐकलेस ते तू मला सांगणार आहेस आणि मी ते ऐकावं अशी तुझी इच्छा आहे.

'होय स्वामीजी. माझी तशीच इच्छा आहे.'

'पण ते ऐकण्यापूर्वी मी तुला तीन प्रश्न विचारणार आहे.'

'विचारा स्वामीजी.'

'तू मला सत्यव्रताबद्दल जे सांगणार ते सत्यच आहे. याची तुला

खात्री आहे?'

'नाही. ऐकलं ते खरं की खोटं याबद्दल मला काहीच ठाऊक नाही.'

'ठीक आहे. आता दुसरा प्रश्न. तू सत्यव्रताबद्दल जे काही मला सांगणार आहेत त्यानं माझा काही लाभ होणार आहे का? मला काय त्याचा उपयोग?'

'काहीच लाभ होणार नाही.' सत्यदीप म्हणाला.

'मग आता माझं उत्तर ऐक. तू जे सांगणार ते खरं नाही. सत्य नाही. ते बदनामी करणारं आहे आणि त्याचा मला काहीच लाभ नाही. मी ते ऐकणार नाही. तू सांगू नको.' स्वामी सत्यबोध यांच्या उद्‌गारांनी सत्यदीप स्तंभित झाला. त्यांच्या वैवाहिक उंचीनं तो भारावून गेला. (सॉक्रेटिस कथा)

■ ■ ■

# २०. कुकर्माची फळे

पोपटांनी राजाची माळ चोरली. राजानं त्यांना मारण्यासाठी झाड जाळलं. पुढील जन्मात हा राजा आंधळा धृतराष्ट्र झाला आणि ते शंभर पोपट त्याचेच पुत्र कौरव म्हणून जन्माला आले. माळ चोरणारा दुर्योधन!

एक राजा होता. क्षात्रधर्मी राजाला शिकारीची आवड होती. जंगलात खोलवर जाऊन शिकार साधायची. हा त्याचा शिरस्ता. असाच एकदा वनात गेला. थकूनभागून एका झाडाखाली बसला. डेरेदार झाडाच्या त्या सावलीत राजाला गाढ झोप लागली. राजाच्या गळ्यात मोठी मोत्यांची माळ होती. माळेचे मणी पाणीदार होते. चकाकत होते. झाडावर एक पाखरांचा थवा होता. चिवचिवाट चालला होता. पोपट होते ते. त्यांचाही एक राजा होता. मोठा दिमाखदार आणि डौलदार पोपट होता. त्यानं ती मोत्यांची माळ बघितली. त्यानं आपल्या सर्व भाईबंदांना सांगितलं..... आपण ती माळ घेऊया. एकेक मणी आपण वाटून घेऊ. आपल्या गळ्यात छान दिसेल आणि गळ्यात घालायचा नसला तरी आपण वाण्याला विकून टाकून खायला दाणे मिळवू. सगळ्या पोपटांना ही कल्पना पसंत पडली. त्यांनी पंख फडफडले.

मग पोपटराजा वेगानं पंख उभारून खाली झेप मारून आला. राजाला तर गाढ झोप लागली होती. मोत्याच्या माळेचा एक भाग जमिनीवर रुळत होता. पोपटराजानी अलगद चोचीनं ती माळ गळ्यातून सोडवली आणि ती घेऊन पटकन झाडावर गेला. राजा जागा झाला. गळ्यात माळ नही हे पाहून तो अस्वस्थ झाला. संतापला. त्यानं सहज वर पाहिलं.

झाडावर पक्षी होते. पोपट होते. त्या पोपटराजाच्या चोचीत माळ होती. राजा खालून म्हणाला, 'बऱ्या बोलानं माझी माळ द्या. नाहीतर...'

'नाहीतर काय? सर्व पक्षी हसले.

'तुम्हाला बाण मारून ठार मारीन.'

'आम्ही शंभर आहोत. तुझ्याकडे तितके बाण आहेत?'

राजा हतबद्ध झाला. पोपट माळ देईनात. वास्तविक पोपटांनी राजाची माळ चोरण्याचं कुकर्म केलं होतं. आता राजाही हट्टाला पेटला. इरेला पडला. बाण मारून पोपट मारणं शक्य नाही हे पाहून राजानं काय करावं....

त्यानं झाडाखाली आग लावली. पोपटांना उडायलाही संधी मिळाली नाही. शंभर पोपट जळून मेले. राजा ते पोपट जळताना बघत होता. पण त्याला काहीच वाटलं नाही. पोपटांनी माळ चोरली. राजानं झाड जाळलं. पुढील जन्मात हा राजा आंधळा धृतराष्ट्र झाला आणि ते शंभर पोपट त्याचेच पुत्र म्हणून कौरव जन्माला आले. माळ चोरणारा दुर्योधन! आणि मग पुढं महाभारत घडलं.

■ ■ ■

# २१. मातृवध आणि पितृवर

परशरामानं पित्याच्या - जमदग्नी ऋषींच्या आज्ञेने माता रेणुकेचा वध केला. आणि प्रसन्न झालेल्या पित्याकडून मातेला पुन्हा जिवंत करण्याचा वर मागितला. मातृपितृभक्त परशरामानं आपल्या भक्तीच्या बळावर पित्याची आज्ञा पालन करणे आणि मातेची प्राप्ती करणे या दोन्ही गोष्टी साध्य केल्या.

कोपिष्ट ऋषी जमदग्नी यांनी राजा प्रसेनजित याच्या मुलीशी रेणुकेशी विवाह केला. त्यांना रुमण्वत, सुषेण, वसू, विश्वावसू व परशुराम असे पाच पुत्र होते. एकदा रेणुका गंगेवर स्नानासाठी गेली असता चित्ररथ गंधर्व जलक्रिडा करताना तिनं पाहिलं. आपणही अशीच जलक्रीडा करावी असा विचार तिच्या मनात येऊन गेला. अंतदृष्टी असलेल्या जमद्‌गींना हे समजले. ते कोपले. ते रोज अग्निहोत्र करीत. ती वेळ चुकली. त्यांनी एकेक करून आपल्या चार पुत्रांना बोलावलं आणि सांगितलं.....

"मातेचा वध करा."

मातेचा वध करायला कोणता पुत्र तयार होईल?

रुमण्वत, सुषेण, वसू, विश्वावसू या चौघांनीही मातेचा वध करण्यास नकार दिल्यावर जमदग्नींनी त्यांना शाप देऊन निश्चेष्ट केले.

मग आला परशराम. परशराम कमालीचा पितृभक्त होता. मातेवर तर त्याचं प्राणापलिकडं प्रेम होतं. पित्याची आज्ञा मानावी तर मातेचा वध होतो, न मानावी-पित्याची आज्ञा भंग केल्याचं पाप! अशा शृंगापत्तीत सापडलेल्या परशरामानं अखेर पित्याची आज्ञा मानण्याचंच ठरवलं.

आणि परशरामानं क्षणार्धात मातेचा वध केला. रेणुका कोसळली. अन्य चार पुत्रांच्या पार्श्वभूमीवर आपल्या या पंचमपुत्राची आपल्यावरील भक्ती पाहून कोपिष्ट जमदग्नी भारावून गेले. आणि समाधानानं ते म्हणाले,

"पुत्रा वर माग. तुझ्या कृतीनं मी संतुष्ट आहे."

"पिताश्री. मागाल तो वर देणार?"

"हां हो देणार!"

"पिताश्री, या एकाच वरात मला तीन उप-वर हवेत द्याल?"

"माग तर खरं, तुला हवं ते सर्व दिलं. जमदग्नीचा शब्द आहे."

"पिताश्री, सर्व माझे बंधू सजीव व्हावेत. माता जिवतं व्हावी आणि मातेला स्ववधाची स्मृती राहू नये. हे वर मला द्या. माझी कृतपापातून मुक्तता व्हावी."

परशरामानं राज्य, ऐश्वर्य, स्त्री इ. कोणताही वर न मागता माताबंधू यांना परत मिळवण्यासाठी वर मागितला. हे ऐकून जमदग्नी संतोष पावले आणि त्यांनी तत्काळ परशरामाच्या बंधूंना व माता रेणुकेला जिवंत केलं.

मातृपितृभक्त परशरामानं आपल्या भक्तीच्या बळावर पित्याची आज्ञा पालन करणे आणि मातेची प्राप्ती करणे या दोन्ही गोष्टी साध्य केल्या.

■ ■ ■

# २२. कुंडल्यांचे विसर्जन

गजानन महाराजांचा बालपणापासून ज्योतिषशास्त्र, फलज्योतिष यांचा अभ्यास होता. पण उठसूठ एखाद्याचं भविष्य सांगणं किंवा त्या कुंडल्यांच्या चौकटीत अडकणं हे मात्र त्यांनी कधीच केलं नाही. आध्यात्माच्या क्षेत्रातील व्यक्तीनं त्रिकालज्ञानाचा वेध घेण्याचा प्रयत्न करायचा असतो. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचा वेध हे सीमित क्षेत्र झालं. त्यामुळंच भविष्यकथन करण्याचं मी टाळतो असे ते म्हणत.

अक्कलकोटनिवासी श्री गजानन महाराज हे अलौकिक व साक्षात्कारी पुरुष होते. त्यांना अग्निहोत्री असल्यामुळे वैश्वानर अवतार मानले जायचे. सत्यधर्मप्रणेता या नात्याने अत्यंत व्रतनिष्ठ राहून या सत्पुरुषाने जीवनभर उपासना केली.

गजानन महाराजांचा बालपणापासून ज्योतिषशास्त्र, फलज्योतिष यांचा अभ्यास होता. त्यांचे पितामह श्री तात्यामहाराज यांच्याकडून त्यांना याबाबत ज्ञान प्राप्त होते. पंचांगाच्या आधारे जन्मकुंडल्या तयार करणे आणि त्यावरून फलज्योतिष वर्तवणे ही गोष्ट त्यांना सहजसोपी होती. श्री गजानन महाराज (राजीमवाले) यांच्याकडे जगप्रसिद्ध अशा अनेक व्यक्तींच्या कुंडल्या होत्या. म. गांधी, पं. नेहरू, ॲडॉल्फ हिटलर, ॲटली यांसारख्या विश्वविख्यात व्यक्तींच्याही कुंडल्या त्यांच्या संग्रही होत्या. श्री गजानन महाराजांच्या गादीखाली अशा कुंडल्यांचे खूप कागद असत. पण उठसूठ एखाद्याचं भविष्य सांगणं किंवा त्या कुंडल्यांच्या चौकटीत अडकणं हे मात्र त्यांनी कधीच केलं नाही. एखाद्या व्यक्तीच्या जीवनात वेध घेण्यापेक्षा त्रिकालाचा वेध घेणं हेच त्यांनी अधिक पसंत केलं होतं.

याबद्दल त्यांना एकदा कुणीतरी विचारलं असता, श्री गजानन महाराज म्हणाले, 'अध्यात्म्याच्या क्षेत्रातील व्यक्तीनं त्रिकालज्ञानाचा वेध घेण्याचा

प्रयत्न करायचा असतो. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचा वेध हे सीमित क्षेत्र झालं. त्यामुळंच भविष्यकथन करण्याचं मी टाळतो.'

'कर्मवशात व दैववशात मनुष्याचे जीवन आकार घेत असते. मग आपण त्यात लक्ष घालून आपल्या अखंड उपासनेत व्यत्यय नाही का येणार?'

१९४७-४८ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर श्री गजानन महाराज यांच्या मठात अनेक राष्ट्रीय स्तरावरील लोक, नेते येत असत. त्यांच्या काही नोंदीही होत्या.

राजकारणाशी अथवा समाजकारणाशी श्री महाराज यांचा प्रत्यक्ष संबंध कधीच नव्हता. तरीपण या विषयाचा संबंध प्रत्यक्ष अध्यात्मभूमी असलेल्या मठाशी नको, असा विचार करून तपाचरण आणि सत्यधर्मपालन याच दोन व्रतांच्या अनुसरणासाठी श्री गजानन महाराजांनी काय करावं? सर्व जन्मकुंडल्या, ज्योतिषविषयक नोंदी, अन्य संबंधित कागदपत्रे एकत्र केली आणि त्या सर्व कागदपत्रांच्या संभाराचं विचारपूर्वक विसर्जन केलं. त्यामुळे त्यावेळी महाराजांना पूर्ण मुक्तीचा आनंद मिळाला.

■ ■ ■

# २३. नवा युगधर्म : अग्निहोत्र

दक्षिण अमेरिकेतील चिलीमधील ॲईज पर्वतावर अग्निहोत्र मंदिराची स्थापना झाली. या परिसरात आणि आसपासच्या गावात शेकडो गोरे अग्निहोत्री स्वधर्म पाळूनही अग्निहोत्र करताहेत. अग्निहोत्र हा नवा युगधर्म आहे हे अंत:करणातील परमेश्वरभक्तीनेच या लोकांना पटवून दिले आहे.

पुण्याच्या नू.म.वि.चे विद्यार्थी असलेले वसंत विठ्ठल परांजपे या नावाचे उद्योजक असलेले गृहस्थ..... स्वातंत्र्याच्या आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता. धारवाडजवळ एक लहानसा कागदकारखाना काढण्याच्या निमित्ताने त्यांची भेट उद्योगपती बाबुराव पारखे यांच्याशी झाली. आणि त्यामुळेच ते अक्कलकोटाच्या श्री गजानन महाराजांच्या संपर्कात आले. महाराजांनी सत्यधर्मासाठी अग्निहोत्राचा प्रचार करण्याची इच्छा व्यक्त केली. वसंतरावांनी याच विषयावर ग्रेस अलोन या नावाचे एक इंग्रजी पुस्तक लिहिले.

एवढेच नव्हे तर अग्निहोत्राचा प्रसार करण्यासाठी वसंतराव परांजपे विश्वपरिक्रमा करण्यासाठी निघाले.

पैसा नाही, परिचय नाही, संपर्क नाही अशा स्थितीत परदेशी जायचं म्हणजे धाडस होतंच. पण श्री गजानन महाराज यांचा आशिर्वाद त्यांच्या भक्तमंडळींच्या सक्रिय शुभेच्छा आणि ज्या कार्यासाठी वसंतराव निघाले होते त्या कार्याची अंगभूत थोरवी यांमुळे वसंतराव परांजपे यांनी अमेरिकेस प्रस्थान ठेवले.

अमेरिकेसारख्या भौतिक प्रगतीने समृद्ध असलेला देश. अग्निहोत्राला मागासलेपण समजण्याची शक्यता. पण वसंतरावांनी अमेरिकेतील डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ, लेखक यांच्या गाठीभेटी घेऊन मन:शांतीसाठी या विधीचे महत्त्व किती आहे हे पटवून दिले. ख्रिस्त धर्माचे निष्ठावंत उपासक

असलेल्या अनेक ख्रिस्ती बांधवांना वसंतरावांनी हे पटवून दिले की जुन्या करारात डॅनियलचे सुर्योदय-सूर्यास्त समर्थाचे आहुतीचे तत्त्वच अग्निहोत्रात आहे.

वसंतरावांनी सर्व युरोपीय, अमेरिकी देशांत सांगितले.

'स्वत:वर' जितके प्रेम करता तितकेच शेजाऱ्यावर करा हा प्रभू येशूचा संदेश आणि सर्वभूती दया व मैत्री हा वैदिक संदेश एकच आहेत. आणि अग्निहोत्राद्वारे हाच संदेश पोचवायचा आहे.

अमेरिकेतील व्हर्जिनिया राज्यात १९७२ मध्ये फाइव्ह फोल्ड जाय या नावाची धर्मादाय संस्था स्थापण्यात आली. मॅडिसन येथे पहिले अग्निमंदिर निघाले. युरोपातील राष्ट्रासही अग्निहोत्राचा प्रसार झाला.

दक्षिण अमेरिकेतील चिलीमधील ॲईज पर्वतावर अग्निहोत्र मंदिराची स्थापना झाली. तपोवनसदृश या परिसरात आणि आसपासच्या गावात शेकडो गोरे अग्निहोत्री स्वधर्म पाळूनही अग्निहोत्र करताहेत.

अग्निहोत्र हा नवा युगधर्म आहे हे अंत:करणातील परमेश्वरभक्तीनेच या लोकांना पटवून दिले आहे.

■ ■ ■

# २४. दगड आणि सोनं

साधुमहाराज त्या लोभी सावकाराला म्हणाले, त्या मोहनमाळेचा तू उपयोग करीत होतास का? नाही ना? खोटंच समाधान. मोहनमाळ जमिनीत पुरलेली. तुला मात्र ती आपली वाटली. आता या दगडालाच मोहनमाळ समजून तू रोज त्या खड्ड्याकडं बघत जा. तुला समाधान मिळेल, सावकाराचे डोळे उघडले.

पंचक्रोशीत त्या साधुमहाराजांची ख्याती होती. साधुमहाराज स्वत: विरक्त, संन्यासी होते. पण संसारी लोकांना त्यांचे व्यावहारिक मार्गदर्शन मिळत असे. ते लोकांना छोट्या-मोठ्या गोष्टींद्वारा सहजबोध करीत असत. त्या पंचक्रोशीतील एका गावात एक धनलोभी सावकार होता. सोनंनाणं, गडगंज संपत्ती जमा करूनही सावकाराचा लोभ सुटत नव्हता. कमी होत नव्हता. एकदा सावकाराला एक मोहनमाळ मिळाली. लखलखीत शुद्ध सोन्याची. ती मोहनमाळ दुसऱ्या कोणी पाहू नये म्हणून सावकारानं ती मोहनमाळ आपल्या घरापाठीमागच्या अंगणात अगदी रात्रीच्यावेळी एकट्यानं जाऊन पुरून ठेवली. खड्डा खणला, वर माती घातली. आजूबाजूला कोणी नाही ना याची खात्री करून घेतली आणि तो परतला.

पण त्याचं दुर्दैव असं की एका अट्टल चोरानं झाडाआडून सावकाराचं हे कृत्य बघितलं होतं. त्याचे डोळे अंधारातही चमकले आणि त्यानं डाव साधला. सावकाराची पाठ फिरताच त्या चोरानं खड्डा उकरला. मोहनमाळ घेऊन त्यानं मातीनं खड्डा भरला, वर होती तशीच माती त्यानं पसरून ठेवली. सावकाराला या प्रकाराची काहीच कल्पना नव्हती. तो खुशीत गाजरं खात होता. रोज जातायेता तो त्या खड्ड्याकडं नजर टाकायचा. माती जशीच्या तशी आहे हे पाहून खूष होऊन परत जायचा आणि एक दिवस रात्रीच्यावेळी तो मोहनमाळ नव्हतीच. त्याला धक्का बसला. तो ऊर बडवून

घेऊ लागला. त्याच्या मित्रानं त्याला साधू महाराजांकडं नेलं.

साधुमहाराजांनी त्याची प्रेमानं विचारपूस केली आणि त्याला सांगितलं. ज्या जागी तू मोहनमाळ पुरली होती त्याच जागी एक दगड पुरून ये. दुसऱ्या दिवशी सावकार त्याच जागी दगड पुरून आला. तशीच माती त्यानं टाकली. दुसऱ्या दिवशी तो सावकार पुन्हा साधुमहाराजांकडं आला आणि त्यानं विचारलं, महाराज आता मी काय करू म्हणजे मला मोहनमाळ मिळेल? साधुमहाराज हसले आणि त्या लोभी सावकाराला म्हणाले, त्या मोहनमाळेचा तू उपयोग करीत होतास का? नाही ना? खोटंच समाधान. मोहनमाळ जमिनीत पुरलेली. तुला मात्र ती आपली वाटली. आता या दगडालाच मोहनमाळ समजून तू रोज त्या खड्ड्याकडं बघत जा. तुला समाधान मिळेल. सावकाराचे डोळे उघडले.

■ ■ ■

# सुयोग प्रकाशनाची
# मुलांसाठी अत्यंत उपयुक्त पुस्तके

| | |
|---|---|
| पंतप्रधान लालबहादूर शास्त्री | डॉ. न. म. जोशी |
| फत्तेवाडीचा झुंजार | डॉ. न. म. जोशी |
| बजरबट्टू | डॉ. न. म. जोशी |
| महामानव सावरकर | डॉ. वि. य. कुलकर्णी |
| डॉ. होमी भाभा | डॉ. वि. य. कुलकर्णी |
| संत श्री गाडगेमहाराज | डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर |
| स्वामी विवेकानंद | डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर |
| श्री रामकृष्ण परमहंस | डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर |
| युगकर्ता सचिन | अनंत मनोहर |
| विक्रमादित्य गावस्कर | अनंत मनोहर |
| कपिल देव | अनंत मनोहर |
| जर्मन जगरनॉट बोरीस बेकर | अनंत मनोहर |
| हाच यशाचा मार्ग खरा | डॉ. माधव पोतदार |
| सभेत कसे बोलावे ? | डॉ. माधव पोतदार |
| विद्यार्थी, शिक्षक, पालक समस्या-उपाययोजना | डॉ. माधव पोतदार |


संपर्कासाठी पत्ता :

**सुयोग प्रकाशन**

९८६, सदाशिव पेठ, ज्ञानप्रबोधिनी रस्ता,
पुणे ४११ ०३०. फोन (फॅक्स) - २४४९५५८४